वनजमीन-नागपूर.

मे.अमिताशा एंटरप्रायझेस प्रा. लि., नागपूर यांना ट्रान्समिशन टॉवर निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी मौ.नागलवाडी, ता.हिंगणा, जि.नागपूर येथील १०.९४ हेक्टर झुडपी जंगल जमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांकः एफएलडी-३४१४/प्र.क्र.९९/फ-१०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :२९.११.२०१७

वाचा :-

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/I/आय.डी-१२२१८/१९४८/१३-१४,दि.२८.०२.२०१४.

२) शासनपत्र समक्रमांक दि.२१.०१.२०१५

३) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र.एफ.नं.६-एमएचसी-०५/ २०१५-बीएचओ/४६९,दि.१९.११.२०१५

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-१७/एनसी/I/आय डी-१२२१८/२१११/१६-१७, दि.१४.०२.२०१७ & क्र. डेस्क-१७/एनसी/ आर एस-१/ आय डी-१२२१८(१बी)/७१७/१७-१८, दि.१९.०६.२०१७.

५) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र.एफ.नं. ६-एमएचसी-०५/२०१५-बीएचओ/२१४६,दि.२७.०७.२०१७

६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/नोसेल/१/आय.डी-१२२१८/१७८४/१७-१८,दि.२४.१०.२०१७

आदेश :-

ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मे.अमिताशा एंटरप्रायझेस प्रा. लि., नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेला ट्रान्समिशन टॉवर निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी १०.९४ हेक्टर झुडपी जंगल जमीन वळती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रानुसार सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने १०.९४ हेक्टर झुडपी जंगल वळतीकरणासाठीचा प्रस्ताव उपरोक्त अ.क्र.२ येथील पत्रानुसार केंद्र शासनास सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर सखोल विचार करुन, १०.९४ हे. झुडपी जंगल जमीन वळती करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावास काही अटींसह सदर अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून वरील अ.क्र.३ येथील पत्रान्वये तत्वत: मंजूरी दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र. ४ येथील पत्रान्वये अटी पूर्तता अहवाल पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांना सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांनी कारखान्याच्या विस्ताराकरीता १०.९४ हेक्टर झुडपी जंगल जमीन वळती करण्याबाबतच्या प्रस्तावास काही अटींसह अ.क्र.५ येथील पत्रान्वये अंतिम मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांचे पत्र अ.क्र. ६ अन्वये पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि.२७.०७.२०१७ रोजीच्या अंतिम मान्यता आदेशातील अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केली असल्याचे कळविले आहे.

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प यंत्रणा म्हणजेच मे.अमिताशा एंटरप्रायझेस प्रा. लि., नागपूर यांना, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या पत्रासह जोडलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली आणि खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली ज्यामध्ये, झुडपी जंगल जमीन समाविष्ट आहे, अशी एकूण १०.९४ हेक्टर वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत ट्रान्समिशन टॉवर निर्मिती कारखान्याच्या विस्तारासाठी वळती करण्यात यावी. सदर वळतीकरण भारत सरकारच्या दि.१९.११.२०१५ रोजीच्या तत्वत: व दि.२७.०७.२०१७ रोजीच्या अंतिम मान्यतेच्या पत्रांतील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर करण्यात यावे.

१. प्रकल्प यंत्रणा वर नमूद केलेल्या भारत सरकारच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.),नागपूर हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना व या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन), १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

३. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non-compliance) संबंधित उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दि.२५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांना सादर करतील.

अनुसूची

गाव	तालुका, जिल्हा	स. नं. /ग. नं..	क्षेत्र (हे.)	वैधानिक दर्जा
नागलवाडी	ता. हिंगणा, जि. नागपूर	३९	३.८४०	झुडपी जंगल (महसूल विभाग)
		४१	२.०४०	झुडपी जंगल (वन विभाग)
		४२	५.०६०	झुडपी जंगल (वन विभाग)
एकूण क्षेत्र (हे.)			**१०.९४**	

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२९१५४७१८५५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.11.29 15:51:07 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत :

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.

३. सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य,नागपूर
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
८. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर
१०.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग,नागपूर.
११. जिल्हाधिकारी,नागपूर
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नागपूर.
१३.मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर.
१४.उप वनसंरक्षक,नागपूर वन विभाग, नागपूर.
१५.मे.अमिताशा एंटरप्रायझेस प्रा. लि., ३६ निल निलडोह, हिंगणा रोड, नागपूर,जि.नागपूर
१६.निवडनस्ती (फ-१०)

२. जिल्हाधिकारी-नागपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद-नागपूर व उप वनसंरक्षक-नागपूर वनविभाग, नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. मे.अमिताशा एंटरप्रायझेस प्रा. लि. यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्रमांक, गट क्रमांक त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत आणि त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.),नागपूर यांना देण्यात यावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावेत.

Forest Land-Nagpur.
Diversion of 10.94 ha. Forest land (Zudpi Jungle) in favour of M/s. Amitasha Enterprises Pvt. Ltd., Nagpur for expansion of existing Transmission tower manufacturing unit At. Nagalwadi, Tal. Hingna, Dist. Nagpur.

Government of Maharashtra
Revenue and Forest Department
Government Order No.FLD-3414/C.R.99/F-10
Mantralaya, Mumbai 400 032.
Date:29.11.2017

Read:-

1) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No. Desk-17/NC/I/I.D.12218/1948/13-14, dated 28.02.2014.
2) Letter from Government of Maharashtra, even no., dated 21.01.2015
3) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Nagpur F. No. 6-MHC-05/2015-BHO/469, dated 19.11.2015.
4) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No. Desk-17/NC/I/ID-12218/2111/16-17, dt.14.02.2017 & No. Desk-17/NC/RS-1/ID-12218(1B)/717/17-18, dt.19.06.2017.
5) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Nagpur F. No. 6-MHC-05/2015-BHO/2146,dated.27.07.2017.
6) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No. Desk-17/Nocel/1/I.D.12218/1784/17-18, Dated.24.10.2017

Order:-

Whereas, Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at Sr. No. 1 above has submitted a proposal to the State Government, which has been received from M/s. Amitasha Enterprises Pvt. Ltd., Nagpur for diversion of 10.94 ha. of Zudpi Jungle land for expansion of existing Transmission tower manufacturing factory,

AND whereas, Government of Maharashtra after careful scrutiny and consideration has recommended it vide letter referred at Sr. No. 2 to the Government of India to divert the 10.94 ha. of Zudpi Jungle land for the above project under section 2 of Forest (Conservation) Act, 1980;

AND whereas, Government of India after due consideration, vide its letter referred at Sr. No. 3 above granted 'in-principle' approval with certain conditions to above proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer for diversion of 10.94 ha. of Zudpi Jungle land;

AND whereas, the Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide its letters referred at sr. no.4 above, has submitted

compliance of those conditions to the Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Nagpur;

AND whereas, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Nagpur accorded final approval for diversion of 10.94 ha. Zudpi Jungle land At-Nagalwadi, Tal-Hingna, Dist-Nagpur with conditions mentioned in letter referred at sr. no.5 above;

AND whereas, the Additional Principal Chief Conservator of forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur vide his letter referred at sr. no. 6 above has conveyed that User Agency has complied with all the conditions stipulated in Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Nagpur's letter of final approval dated 27.07.2017.

NOW, therefore, Government of Maharashtra hereby directs that the forest land area of 10.94 ha. consisting of Zudpi Jungle land more specifically described in the proposal submitted, vide letter mentioned at sr. no.1 above from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, be diverted to the User Agency, i.e. M/s. Amitasha Enterprises Pvt. Ltd., Nagpur. The diversion shall be effected subject to the terms and conditions mentioned in the in-principle approval letter dated 19.11.2015 and final approval letter dated 27.07.2017 of Government of India. This approval for diversion of forest land is also subject to compliance of following conditions by the User Agency-

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the in-principle and final approval letters of Government of India, referred above. The Chief Conservator of Forests (Territorial), Nagpur shall ensure the strict compliance of the conditions by the User Agency. Chief Conservator of Forests (Territorial), Nagpur will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
2. Non-compliance of any of the conditions mentioned in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Divisional Forest Officer / Chief Conservator of Forests shall report through the State Govt. to Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Government of India, Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office (WCZ), Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on dtd. 25.10.1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

SCHEDULE

Village	**Taluka and District**	**Survey No. / Gut No.**	**Area (in Ha.)**	**Legal Status**
Nagalwadi	Tal. Hingna, District Nagpur	39	3.840	Zudpi Jungle (Revenue Department)
		41	2.040	Zudpi Jungle (Forest Department)
		42	5.060	Zudpi Jungle (Forest Department)
Total Area (ha.)			**10.94**	

This Government Order of Maharashtra Government is available on its website www.maharashtra.gov.in. Reference no. for this Order is 201711291547185519. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2017.11.29 15:51:28 +05'30'

(Virendra Tiwari)
Chief Conservator of Forests (Mantralaya).

Copy:

1. Secretary, Ministry of Environment & Forests, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office (WCZ), Nagpur.
3. Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai.
4. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur.
5. Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
7. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
8. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
9. Divisional Commissioner, Nagpur Division, Nagpur.
10. Collector, Nagpur.
11. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
12. Chief Conservator of Forests (Territorial), Nagpur.
13. Chief Executive Officer, Z.P. Nagpur, Nagpur.
14. Deputy Conservator of Forests, Nagpur.
15. M/s. Amitasha Enterprises Pvt. Ltd., 36 Nill Nildoh, Hingna Road, Nagpur, Dist. Nagpur.
16. Select File, Desk F-10.

2. Collector-Nagpur, Chief Executive Officer-Zilla Parishad, Nagpur and Deputy Conservator of Forests, Nagpur are hereby directed to forward the copy of this order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self-government bodies for the information of general public.

3. M/s. Amitasha Enterprises Pvt. Ltd., Nagpur is hereby directed that they should publish the entire order of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No. etc. and along with the conditions and safe guards imposed by the Central Government while granting forest clearances, in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language and submit the copies of newspapers to Chief Conservator of Forests (Territorial),Nagpur.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.